महाराष्ट्र विधानसभा
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१३
(सकाळी ०९.१५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १)

(१) **सर्वश्री सुधाकर देशमुख,** देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, कृषिभूषण साहेबराव पाटील, मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, नितीन भोसले, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, डॉ.सुधाकर भालेराव, सर्वश्री.नाना पटोले, एकनाथराव खडसे (पाटील), अबू आजमी, शरद गावित, रशीद मोमीन, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री महादेव बाबर, कुमार आयलानी, नवाब मलिक, रमेश थोरात, अब्दुल सत्तार, राजहंस सिंह, अमीन पटेल, बाबा सिद्धीकी, अस्लम शेख, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात २३,५६६ संस्था वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असणे, तसेच ३७,३३० हेक्टर जमीन उपलब्ध असणे, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांना ३५,०००/- रुपयांची लाच घेताना झालेली अटक, तीन राज्यांतील कोट्यावधींची संपत्ती जप्त करण्यात येणे तसेच त्यांच्या निवासस्थानी वक्फच्या जमिनीसंबंधातील संशयास्पद कागदपत्रे सापडणे, बोर्डाच्या मालमत्तांचा भाडे करार वाढविणे, रद्द करणे वा नवे करार करणे आदी निर्णयांचे अधिकार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांना नसतानासुद्धा निर्णय घेणे, तीन वर्षांपूर्वी मुख्य दक्षता आयुक्तांनी पंतप्रधान कार्यालयास वक्फ बोर्डातील गैरव्यवहारासंदर्भात घोटाळ्यांची चौकशीची मागणी करणे, वक्फच्या गत २५ वर्षांतील कारभाराची सीबीआय चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येणे, राज्यातील मुस्लिम समाजाने वक्फकरिता दिलेल्या जमिनींना या अधिकाऱ्यांकडून संगनमताने ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, तसेच राज्यात वक्फ बोर्डाची हजारो एकर जागा असणे व यासंदर्भात वक्फ बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत गैरव्यवहार सुरु असणे, परिणामी संपूर्ण राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संतापाची भावना, याबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांच्याविरुद्ध सीबीआय चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री गणपतराव देशमुख,** मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, नितीन भोसले, प्रकाश (अण्णा) शेंडगे, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री विवेक पाटील, धैर्यशिल पाटील, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"केंद्र शासनाकडून महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील जनतेला अन्न सुरक्षा देण्यासाठी दिनांक ५ जुलै, २०१३ रोजी अध्यादेश निर्गमित करण्यात येणे, राज्यातील ग्रामिण भागातील ७० टक्के व शहरी भागातील ५० टक्के जनतेला स्वस्त धान्य दुकानातून २ रुपये किलो गहू, ३ रुपये किलो तांदूळ व १ रुपया किलो ज्वारी, बाजरीसारखे भरड धान्य देण्याची तरतूद केलेली असणे, राज्यातील शहरी लोकसंख्येचे प्रमाण इतर राज्याच्या तुलनेने देशात सर्वात जास्त असल्याने त्यामध्ये राज्याचे होणारे नुकसान, त्यासंबंधी भरपाईबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली मागणी, राज्यातील अनेक भागामध्ये व अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकानेच लांब अंतरावर असणे, तसेच अनेक कुटुंबे रेशन कार्डापासून वंचित असणे, रेशन कार्डामध्ये असलेली अपुरी माहिती व रेशन कार्ड अद्ययावत नसणे, जुनी तसेच बनावट असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात स्वस्त धान्य दुकानातून गैरव्यवहार होण्याची शक्यता निर्माण होणे, त्यामुळे शासनाचे होणारे आर्थिक नुकसान, धान्य वाटपासंबंधी मोठ्या प्रमाणात करावयाची वाहतूक तसेच वाटप व्यवस्था, पुरेशी देखरेख करणारी यंत्रणा इत्यादी शासन करीत असलेली उपाययोजना या योजनेची अंमलबजावणी माहे डिसेंबर, २०१३ मध्ये करण्याची राज्य शासनावर असलेली जबाबदारी, वरील अध्यादेशासंबंधी राज्य शासनाने अंमलबजावणी करताना या संबंधी शासनाचे धोरण व शासन करीत असलेली उपाययोजना व शासनाची भूमिका."

(३) **सर्वश्री अमीन पटेल,** मधु चव्हाण, चंद्रकांत हंडोरे **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटी सेंटर महाराष्ट्र, केरळ, बिहार, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल या पाच ठिकाणी सुरु करण्याबाबत केंद्र शासनाने निर्णय घेतला असून पश्चिम बंगाल, केरळ व बिहार या ठिकाणी उक्त सेंटर सुरु झाले असणे, राज्यात उक्त युनिव्हर्सिटी सेंटर सुरु झाल्यास या युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून किमान २५ हजार मुलांना शिक्षण घेता येणे शक्य होणार असणे, उक्त युनिव्हर्सिटीला राज्यात जागा मिळण्याबाबत उप कुलगुरु यांनी खुलताबाद, औरंगाबाद येथे जागेची पाहणी केली असून या जागेसाठी सकारात्मक मान्यता उप कुलगुरु यांनी दिलेली असताना याबाबतीत अजूनपर्यंत कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्याने अलिगड मुस्लिम विद्यापीठाचे सेंटर निर्माण होण्यासाठी राज्यात विलंब होत असल्याने अल्पसंख्यांक समाजात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून महसूल विभागाने त्वरित निर्णय घेऊन मुस्लीम विद्यापीठासाठी जागा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री लक्ष्मण जगताप,** संजय भेगडे, विलास लांडे, अण्णा बनसोडे, बापूसाहेब पठारे **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"शासनाच्या जिल्हा रुग्णालय व उरो रुग्णालय, औंध, पुणे येथील आस्थापनेच्या वेतनापोटी मासिक २ कोटी रुपये खर्च होत असणे, आवारात आरोग्य सेवा परिमंडळ, पुणे अंतर्गत व उक्त रुग्णालयांतर्गत पदस्थापित कर्मचाऱ्यांनाच निवासस्थान वाटप करण्याचे स्पष्ट शासन व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असताना गेली अनेक वर्षे आस्थापनेव्यतिरिक्तचे लोक निवासस्थाने बेकायदेशीरपणे वापरत असल्याचे उघड होणे, यामुळे शासकीय खर्चातून वीज, पाणी, निवास आदी सुविधा फुकटात वापरल्या जात असणे, नव्याने पदस्थापना होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवासस्थान न मिळणे, जिल्हा रुग्णालयात एक्सप्रेस फीडरकरिता आवश्यक निधीची तरतूद प्राप्त होऊनही केवळ जिल्हा शल्यचिकित्सक यांना अधिकार नसताना चुकीचा तांत्रिक शेरा मारला असणे, त्यामुळे शासनाचा निधी वर्षानुवर्षे अखर्चित असणे, यामुळे वाजक जनरेटर व युपीएस खरेदी करावे लागत असणे, माहे एप्रिल, २०१२ ते मार्च, २०१३ या कालावधीत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत खरेदी करण्यात आलेले विविध साहित्य शासनाच्या कुठल्याही अटी व शर्तींचे पालन न करता खरेदी केले असणे, बाजारभावापेक्षा जास्त दराने निकृष्ट दर्जाचे सोलर वॉटर हिटर युनिट खरेदी केले असणे, निकृष्ट दर्जा सिध्द झाल्यानंतरही संबंधित ठेकेदारास त्याची अनामत रक्कमही परत केली गेली असणे, हॉस्पिटलच्या आवारात प्रशस्त उपहारगृहाचे बांधकाम पूर्ण असूनही रुग्णालयाच्या आत आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधलेल्या रुग्ण नातलगांच्या वेटींग शेडमध्ये जिल्हा शल्य चिकित्सकांकडून बेकायदेशीर खाजगी संस्थेच्या उपहारगृहाकरिता परवानगी देण्यात येणे, कोल्ड स्टोरेजकरिता शासनाकडून निधी प्राप्त होऊनही आजतागायत कोल्ड स्टोरेज चालू न होणे, ब्लड बँक बंद असणे, जिल्हा रुग्णालय सुरु झाल्यापासूनच अतिदक्षता विभाग बंद असणे, त्यामुळे अत्यवस्थ रुग्णांवर शस्त्रक्रिया होत नसणे, अति दक्षता विभागातील डॉक्टर्स ऑन कॉल असल्याने रुग्णांच्या जिवितास सदैव धोका असणे, बरेच रुग्ण क्षुल्लक कारणास्तव बाहेरील खाजगी रुग्णालयाकडे पाठविले जात असणे, रुग्णालयातील केवळ चारच डॉक्टर निवासस्थानात वास्तव्यात असणे, नियतकालीन बदली कालावधी उलटूनही वर्ग १ व २ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत नसणे, त्यामुळे रुग्णालयात भ्रष्टाचार वाढीस लागणे, उक्त बाबींसंदर्भात वारंवार दखल घेऊनही विभाग प्रमुखांची जाणुनबुजून होणारी डोळेझाक, दोषींवर आजवर कुठलीही थेट कारवाई न होणे, परिसरात सुसज्ज रुग्णालय असूनही रुग्ण सेवा मिळत नसल्याने सामान्यांचे होणारे आर्थिक नुकसान, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील),** सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, कृषिभूषण साहेबराव पाटील, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री.सुभाष देसाई, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, रविंद्र वायकर, आर.एम.वाणी, अमिन पटेल, अस्लम शेख, बाबा सिद्दीकी, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री.भिमराव तापकीर, सुधीर मुनगंटीवार, नाना पटोले, गोपाल शेट्टी, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर पारवे, विजय घोडमारे, गोवर्धन शर्मा, हरीष पिंपळे, डॉ.संजय कुटे, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री.कुमार आयलानी, संभाजी पवार, विवेक पंडित, धैर्यशिल पाटील, महादेव बाबर, चंद्रकांत मोकाटे, कॅ.अभिजित अडसुळ, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री.सुरेश जेथलिया, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक

महत्वाच्या बाबीकडे **महिला व बाल विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"निफाड, जि.नाशिक येथील राजीव गांधी नगर वस्तीमध्ये गत ३ वर्षापासून कुपोषणग्रस्त मुलाचे मंगळवार, दिनांक २ जुलै, २०१३ रोजी झालेले निधन, गत दहा महिन्यात राज्यात ४ हजार बालके कुपोषणामुळे दगावली असून नंदुरबार जिल्ह्यात १०२५ बालके, ठाणे जिल्ह्यात ६१२, गडचिरोली जिल्ह्यात ५६१, मेळघाटात गत वर्षभरात ८४४ बालकांचा मृत्यू आणि धारणी व चिखलदरा तालुक्यात गत दोन महिन्यात ६७ बालके याच कारणामुळे दगावणे, तसेच गतवर्षीच्या तुलनेत बालमृत्यूच्या प्रमाणात ३५ टक्याने वाढ होणे व त्यात ४ माता मृत्यूंचाही समावेश असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यासाठी बाल उपचार केंद्राची स्थापना करण्यात येणे परंतु तेथे उपचार घेणाऱ्या बालकांमध्ये सुधारणा होण्याचे प्रमाण अत्यल्प असणे, राज्यातील ठाणे, नंदुरबार, नाशिक, गडचिरोली, यवतमाळ-धारणी, अमरावती-मेळघाट, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये कुपोषणाची समस्या गंभीर असणे, कुपोषित बालके आणि गरोदर माता यांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून जाहिरातींवर शासनाने कोट्यवधींचा खर्च करूनही प्रत्यक्षात आरोग्यामध्ये सुधारणा अत्यल्प असणे, शासकीय पातळीवरील उदासीनता आणि आरोग्य विभागातील गैरव्यवहार यामुळे कुपोषणाची समस्य सुटू शकत नसल्याची जनमानसातून व्यक्त होत असलेली भावना, मेळघाटमधील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची ३३ टक्के पदे रिक्त असून त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाकडून आतापर्यंत केलेल्या उपाययोजना अपयशी ठरत असल्यामुळे तातडीने या गंभीर व सार्वजनिक हिताच्या बाबींच्या संदर्भात उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

(६) **श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात पाणी पुरवठा योजनेचे दरडोई खर्चाचे धोरण हे शासन निर्णय क्र.ग्रापापु १०९५/सि.आर.११२४/पापु-०७ दिनांक १८ मे, १९९६ च्या ग्रामीण नळ योजनेसाठी दरडोई खर्चाच्या प्रमाणकांबाबत असलेल्या परिपत्रकानुसार निश्चित करण्यात आलेले असणे, या निकषांनुसारच पाणी पुरवठा योजनेची मंजुरी त्या वेळेची परिस्थिती तथा क्षेत्र त्यानुसार ठरविण्यात आले असून कोकण वगळता राज्याच्या इतर भागासाठी दरडोई भागाची कमाल मर्यादा या परिपत्रकानुसार ठरवून दिलेली असणे, सन १९९६ च्या धोरणानुसार व निकषानुसार यामध्ये दरडोई खर्चात शिथिलता देण्याच्या हेतूने शासन निर्णय दिनांक १३ ऑगस्ट, २०१२ नुसार सुधारित परिपत्रक विभागाने काढलेले असणे, यात १) निर्देशित डोंगरी भाग-२१२०/-३१८०/-, २) ३० मीटरपेक्षा जास्त स्टॅटीक लिप्ट असलेल्या नळयोजना १७९०/- २६८५/- ३) ३० मीटरपेक्षा स्टॅटिक लिफ्ट असलेल्या नळ योजना - १३९०/- २०८५/-, लिफ्ट असलेल्या नळ योजना १९९६ च्या निकषानुसार दिलेले दर हे कालबाह्य झालेले असून दिलेल्या दरसूचीनुसार सन २०११-१२, २०१२-१३ मध्ये तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाची तुलना ही सन १९९६ सालच्या बाजारभावाशी करणे योग्य होणार नसणे, सन १९९६ मध्ये असलेले पाणी पुरवठा करिता लागणारे आवश्यक साहित्यामध्ये सिमेंट, वाळू, पोलाद, मनुष्यबळ, पाईपलाईन्स, पम्पींग मशीन व इतर आवश्यक बाबीचे ठरविलेले दर हे सन २०१२-१३ च्या दरसूचीनुसार बघता त्या दराच्या चौपट प्रमाणात

दरवाढ झालेली असणे, दरसूचीमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असतानाही पाणी पुरवठा विभागाद्वारे अद्यापही सन १९९६ च्या कमाल मर्यादेत असलेल्या दरडोई खर्चाचे निकष हे पाणी पुरवठा योजनेला मंजुरी देताना उपयोगात आणत आहेत हे योग्य नसणे, तसेच आवश्यक अशा उपांगांचा खर्च हा चालू बाजारभाव पाहता सतत यात वाढ होत असणे, त्यामुळे या निकषांच्या दरडोई खर्चाच्या कमाल मर्यादेत वाढ करणे गरजेचे असणे, शासनाच्या या चुकीच्या धोरणामुळे राज्यातील अनेक गावात अद्यापही पाणीपुरवठा योजनेची नितांत आवश्यकता असतानासुध्दा तथा राज्यातील ग्रामीण व पेरीअर्बन शहरी भागात पाणी टंचाईमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ज्वलंत निर्माण होत असल्याने तातडीने शासनाने या धोरणात सुधारणा करणे आवश्यक असणे, याबाबत अद्यापही शासन निर्णय झालेला नसल्याने निर्माण झालेला असंतोष, सुधारित धोरणाची घोषणा तथा निकषाची सुधारणा तातडीने करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(७) **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे येथे बिझनेस बायोटेक्नॉलॉजी इन्यूबेटर उभारण्यात येणे, इंडस्ट्री रिसर्च अस्टीस्टड कौन्सिल, डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१३ पर्यंत प्रकल्प उभारणीसाठी दिलेला निधी न वापरल्यास सदर निधी परत घेण्याची नोटीस नुकतीच बजावणे, पुणे विद्यापीठाच्या हलगर्जीपणामुळेच या अतिशय महत्वाच्या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने दिलेला निधी परत जाण्याच्या मार्गावर असणे, गतवर्षी पुणे विद्यापीठातील एस.टी.पी.ला बिझनेस बायोटेक्नॉलॉजी इन्यूबेटर उभारण्यासाठी केंद्राने ३४ कोटी रु.निधी देणे, मात्र पुणे विद्यापीठातील वादामुळे परत जाणे, सदर प्रकल्प सुरु करण्यास मान्यता देताना व प्रकल्पाकरिता जागा देताना सदरहू प्रकल्पाची जागा फक्त प्रकल्पाच्या वापरासाठी असावी व त्याची मालकी विद्यापीठाकडे असावी, यासाठी संयुक्त व्यवस्थापन समिती गठन करण्यात यावी, प्रकल्पाचे संचालक म्हणून विद्यापीठाची व्यक्ती असावी, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्कचे नियामक मंडळाचे सदस्य पदसिद्ध असणेबाबत घटनेत बदल करण्यात यावा अशा केंद्र शासनाला न पटणाऱ्या जाचक अटी लादल्याने सदर प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता धूसर होणे, राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला हा प्रकल्प गुंडाळला जाण्याची व इतर राज्यात जाण्याची निर्माण झालेली भीती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **ॲड.सदाशिवराव पाटील,** सर्वश्री सुभाष झनक, राहुल बोंद्रे, अमित पटेल, हनुमंत पाटील-बेटमोगरेकर, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री.अब्दुल सत्तार, अनिल बावनकर, बच्चु कडू, दिपक आत्राम, संजय वाघचौरे, वीरेंद्र जगताप, दिपक चवहाण, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी** मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-

"राज्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या समस्यांसंदर्भात राज्य शासनाने आश्वासन देऊनही कोणतीही कार्यवाही न करणे, राज्यात सिंचनाखालील शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या अनुदानाच्या व सबसिडीच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळत असताना कोरडवाहू शेतकऱ्यांना मात्र कोणत्याही सवलतीचा लाभ न मिळणे, वीज, खते, बियाणे, पीक कर्ज इत्यादी पैकी

कोणताही लाभ न मिळाल्याने व केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत असल्याने कोरडवाहू शेतकऱ्यांवर दरवर्षी ओढवणारे मोठे आर्थिक संकट, राज्यात ज्या शेतकऱ्यांना सिंचन सुविधा मिळते त्यांना अधिक लाभ मिळत असताना अफाट मेहनत करूनही शेती करणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्यांना आर्थिक संकट सोसावे लागणे, हा मोठा अन्याय असल्याने या शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक अनुदान देण्याची आवश्यकता, प्रहार संघटनेने या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांचेशी दिनांक २६ सप्टेंबर, २०११, दिनांक ७ जून, २०१२, दिनांक १६ डिसेंबर, २०१२, दिनांक ८ जानेवारी, २०१३ रोजी बैठका घेवून चर्चा केली असताना व विविध मार्गांनी आंदोलन केले असताना शासनाने दिलेल्या आश्वासनाचे पालन न करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने या कोरडवाहु शेतकऱ्यांना हेक्टरी आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच शेतकऱ्यांची पेरणी ते कापणीपर्यंतची कामे रोजगार हमी योजनेतून घेऊन या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री वल्लभ बेनके,** नवाब मलिक, विजय औटी, किसन कथोरे, बापूसाहेब पठारे, ॲड. अशोक पवार **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"कल्याण-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर माळशेज घाटात दिनांक २५ जुलै, २०१३ रोजी पहाटे ३.३० च्या सुमारास डोंगराचा मोठा कडा निखळून दरड कोसळणे, त्यामुळे घाटातील रस्ता १० फूट खाली खचणे, या दरडीखाली सापडून जुन्नर येथील एका टेम्पो चालकासह ३ जणांचा मृत्यू होणे, महामार्गावरील वाहतूक त्यामुळे ठप्प होणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या लाखो रुपये मालाची नासाडी होणे, रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे व देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याने दरडी कोसळण्याचा प्रकार होत असणे, त्यामुळे होत असलेली जिवित व वित्त हानी, घाटातील रस्त्याचे रुंदीकरण व दरडी कोसळू नयेत याकरिता उपाययोजना करण्याची व त्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **सर्वश्री एकनाथ शिंदे,** राजन विचारे **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"केंद्र शासनाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी जारी केलेल्या सीआरझेडच्या नव्या अध्यादेशामुळे मुंबई जिल्ह्यातील कोळीवाड्यांच्या पुनर्विकासासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीच्या आधारे अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक मिळण्याचा मार्ग मोकळा होणे, त्यामुळे या भागातील इमारती आणि चाळींचा पुनर्विकास दृष्टिपथात आला असणे, परंतु मुंबईला खेटून उभ्या असलेल्या ठाणे जिल्ह्यातील सीआरझेडने बाधित असलेले कोळीवाडे आणि इमारतींना त्या अध्यादेशाचा लाभ मिळत नसणे, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील समस्यांमध्ये फारसा फरक राहिलेला नसून मुंबई आणि ठाण्यातील नियमावलीत भेदभाव करणे योग्य नसणे, व्यापक हितासाठी सीआरझेड कायद्याची नवी नियमावली मुंबईपाठोपाठ ठाणे शहरासाठीसुध्दा लागू व्हायला हवी, परंतु तसे होत नसल्याने ठाण्याच्या कोपरी परिसरातील सुमारे १६५ इमारती आणि अनेक चाळींचा पुनर्विकास अशक्य होणे, ठाणे, नवी मुंबई, वसई, विरार अशा सागरी आणि खाडी किनारी असलेल्या शहरातील लाखो रहिवाशांना त्याचा मोठा

फटका बसत असणे, रितसर परवानगी मिळत नसल्याने काही मंडळीकडून बेकायदा बांधकामे होण्याची शक्यताही नाकारता येत नसणे, त्याचप्रमाणे १९७४ पूर्वीच्या इमारतींच्या पुनर्बांधणीसाठीच प्रोत्साहनपर चटईक्षेत्र देण्याचे शासनाचे धोरण असणे, या धोरणात सुधारणा करून ३० वर्षापूर्वीच्या इमारतींना त्या सवलती दिल्यास अनेक इमारतींच्या पुनर्बांधणीचा मार्ग प्रशस्त होईल, याबाबत शासनाने केलेली किंवा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(११) **सर्वश्री संदीप नाईक,** जितेंद्र आव्हाड **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नवी मुंबई परिसरात सिडको महामंडळाने गृहनिर्माण योजनेअंतर्गत मध्यम व कमी उत्पन्न गटातील व्यक्तींसाठी बांधलेल्या इमारती, इमारतींचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याने अल्पावधीतच अनेक इमारतींमधील सदनिकांचे स्लॅब कोसळण्याच्या घडलेल्या घटना, त्यात महिला व लहान मुले गंभीररित्या जखमी होणे, इमारतींना तडे गेल्याने पावसाळ्यात पाणी झिरपत असणे, त्यामुळे इमारतींमधून राहणारे हजारो रहिवासी जीव मुठीत धरुन जीवन जगत असणे, या इमारतींच्या पुनर्बांधणीचे काम तात्काळ हाती न घेतल्यास केव्हाही इमारती कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता, सिडकोने इमारतींचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असल्यामुळेच अल्पावधीतच इमारती जीर्ण झाल्या असून मोडकळीस आल्या असल्याचे नागरिकांचे ठाम मत झालेले असणे, त्यामुळे जनतेचा सिडकोवरील उडालेला विश्वास, त्यांच्या पसरलेली संतापाची भावना, या इमारतींना २.५ एफएसआय मंजूर करुन त्यांच्या पुनर्बांधणीचे काम हाती घ्यावे म्हणून ठाणे जिल्हा पालकमंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधी सातत्याने करीत असलेले प्रयत्न"

(१२) **ॲड.आशिष जयस्वाल,** सर्वश्री संजय राठोड, नरेंद्र भोंडेकर, दादाजी भुसे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नागपूर जिल्ह्यातील कन्हान ही राज्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून सदर ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत असताना शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी गावाच्या नागरी सुविधा पुरविणे अडचणीचे होणे, ग्रामपंचायतीचे उत्पन्न कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होत असल्याने ग्रामपंचायतीमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असणे, ३५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात ग्रामपंचायत असमर्थ ठरणे, सर्व कागदपत्रांची पूर्तता करून जिल्हाधिकारी, नागपूर यांनी परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यानंतर शासनाच्या लालफितीच्या कारभारामुळे कन्हान ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतरण न होणे, सर्व राजकीय पक्षांची मागणी असताना नगरपरिषदेचे सर्व निकष पूर्ण होत असताना शासनाच्या उदासिनतेमुळे व दिरंगाईमुळे याबाबत निर्णय न झाल्याने नागरिकांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला तीव्र असंतोष, लोकप्रतिनिधींचा सतत पाठपुरावा व मागणी असतानाही शासनाकडून हा निर्णय होत नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणे, उपरोक्त प्रकरणी शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१३) सर्वश्री विनय कोरे, चंद्रकांत हंडोरे, नवाब मलिक, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"बृहन्मुंबईच्या 'एम' विभागातील गांवदेवी कंपाऊंड चेंबुर येथील सी.टी.एस. क्र.१७२० या सूमारे ३७१७.९० एकूण क्षेत्रफळाच्या जमिनीवर सन १९५२ पासून वस्ती करून राहणाऱ्या व नंतर सातत्याने वाढत गेलेल्या व आता अस्थित्वात असलेल्या २१४ झोपडीधारकांनी श्री.गणेश गांवदेवी सहकारी संस्था स्थापन केलेली असणे व महाराष्ट्र शासनाच्या पुनर्वसन योजने (एस.आर.ए.) नियमानुसार पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, सिटी सर्व्हे क्र.१७३१ व १७३१/१ ते ३ या गोल्फ क्लबच्या आरक्षणाचे क्षेत्र १,८७,७३९.६० चौ.मी. इतके असणे, पूर्वी सिटी सर्व्हे क्र.१७२१, १७२२ आणि १७३१ या लगतच्या जमिनीवर देखील गोल्फ क्लबचे आरक्षण असणे, सिटी सर्व्हे क्र.१७२१ आणि १७२२ या जमिनीवरील आरक्षण सन १९९२ च्या सुधारित विकास योजनेमध्ये आरक्षणातून वगळ्यात आलेले असेण, सिटी सर्व्हे क्र.१७२० चे गोल्फ क्लबचे आरक्षण क्षेत्र १२४३.९० चौ.मी.असुन त्यावर झोपड्या अस्थित्वात असून देखील गोल्फ क्लबकरिता नामनिर्देशित (डेसिग्नेटेड) अस्तित्वात असलेले दर्शविण्यात आलेले असणे, त्यामुळे सदरची पुनर्विकास योजना मंजूर होऊन देखील पूर्णत्वास नेण्यास अडथळे निर्माण हेात असणे, गोल्फ क्लबच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे त्यांचे नावे स्वतंत्र मालमत्तापत्र असून त्यात सिटी सर्व्हे क्र.१७२० मधील १२४०.९० चौ.मी. डेसिग्नेटेड रिझरवेशन क्षेत्र अंतर्भूत नसणे, गोल्फ क्लबद्वारे आवार भिंतीचे बांधकाम सदर १२४०.९० चौ.मी. डेसिग्नेटेड रिझरवेशन जागेच्या बाहेरुन केलेले असणे, गोल्फ क्लबकरिता या भूभागाचे हे क्षेत्र आवश्यक नसून सदर पुनर्विकास योजना पूर्णत्वास नेण्याकरिता सदर जागेचे आरक्षण बदलण्यास गोल्फ क्लबची हरकत नसणे व तसे लेखी पत्र त्यांच्या तर्फे देण्यात आलेले असणे, सदर जागेवरील गोल्फ क्लबकरिता असलेले डेसिग्नेटेड रिझरवेशन वगळ्याकरिता विकासकाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ उप कलम १(ब) च्या मान्यतेनुसार बृहन्मुंबई क्षेत्रात पुनर्वसन योजना राबविण्याकरिता आरक्षण वगळून निवासी वापर फेरबदल करणेबाबत कलम ३७(२) च्या मान्यतेकरिता अप्पर मुख्यसचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये सादर करणे व तो अंतिम मान्यतेकरिता नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, सदर प्रस्तावर नगरविकास विभागातर्फे कोणतीही कार्यवाही न होणे परिणामी पात्र लाभार्थ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

(अ) गुरुवार, दिनांक १८ जुलै, २०१३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला **डॉ.सुजीत मिणचेकर व इतर वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११२२५९ **"चौथीपर्यंत वर्ग असणाऱ्या शाळांना पाचवीचा, तर**

सातवीपर्यंत असणाऱ्या शाळांना आठवीचा वर्ग जोडण्याच्या शासनाच्या आदेशाबाबत".

(ब) तारांकित प्रश्न.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) मुख्यमंत्री :

(अ) महाराष्ट्र मोटार वाहन (दुसरी सुधारणा) नियम, २०१३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर.०११०/ प्र.क्र.११४/पु.बां.क्र.२९/परि-२, दिनांकित ९ मे, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

(ब) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(क) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचे वार्षिक अहवाल व सदर अहवालातील आयोगाचा सल्ला डावलल्याप्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागांची आयोगाचा सल्ला न स्विकारण्याबाबतची कारणमिमांसा दर्शविणारी स्पष्टीकरणात्मक निवेदने सभागृहासमोर ठेवतील.

(२) उद्योग मंत्री :

(अ) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ब) कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन २००५-२००६ या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(३) पर्यटन मंत्री :

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ या वर्षांचा अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा व चौतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री :

(अ) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ब) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,

औरंगाबाद यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(क) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूरच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा अलग लेखापरिक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(५)	**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**	:	मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१०-२०११ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.
(६)	**महिला व बाल विकास मंत्री**	:	महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(७)	**पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री**	:	महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन २००३-२००४, २००४-२००५, २००५-२००६ व २००६-२००७ या वर्षांचा अनुक्रमे बत्तीसावा, तेहतीसावा, चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(८)	**पर्यावरण मंत्री**	:	महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : अंदाज समितीचा एकतिसावा व बत्तिसावा अहवाल सादर करणे.

चार : लोकलेखा समितीचा तेरावा व चौदावा अहवाल सादर करणे.

पाच : रोजगार हमी योजना समितीचा सव्विसावा अहवाल सादर करणे.

सहा : विधानसभा आश्वासन समितीचा बाविसावा व तेविसावा अहवाल सादर करणे.

सात : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सातवा अहवाल (सन २०१२-२०१३) सादर करणे.

आठ : उपविधान समितीचा चौथा अहवाल सादर करणे.

नऊ : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

दहा : सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुभाष धोटे, बच्चू कडू, दिनानाथ पडोळे, प्रा. विरेंद्र जगताप, श्री.सुनिल केदार, डॉ. नामदेव उसेंडी, सर्वश्री. सुभाष झनक, विजय खडसे, केवलराम काळे, प्रकाश डहाके, वामनराव कासावार, रावसाहेब शेखावत, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. अनिल बावनकर, आनंदराव गेडाम, सुरेश जेथलिया, एकनाथराव खडसे (पाटील), बाळा नांदगावकर, नाना पटोले, देवेंद्र फडणवीस, विजयराज शिंदे, ॲड आशिष जयस्वाल, डॉ. संजय कुटे, डॉ. खुशाल बोपचे, डॉ. संजय रायमुलकर, श्री. दादाराव केचे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (मंत्र्यांचे उत्तर) :-

"राज्यात मराठवाडयात व विदर्भात विशेषतः चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, अमरावती व वाशिम या जिल्हयात माहे जुलै, २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे १५०० मि.मी. पावसाची नोंद होऊन हजारो शेतकरी उद्ध्वस्त होणे, लाखो हेक्टर जमिनीवरील पिके नष्ट होणे, जमिनी खरडून गेल्यामुळे पुढील किमान पाच वर्षापर्यत या जमिनींच्या उत्पादन क्षमता कमी होण्याची निर्माण झालेली भीती, या नैसर्गिक आपत्तीमुळे विदर्भातील असंख्य घरे कोसळून झालेली जिवित व मालमत्तेची हानी, शेतकऱ्यांनी कर्ज काढून दुबार तिबार पेरणी केलेली संपूर्ण पिके नष्ट होणे, पुरामध्ये असंख्य जनावरे वाहून जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान, मंठा तालुका (जि.जालना) येथील देवठाणा व अवलगाव ही दोन गावे नदीच्या काठावर असल्यामुळे या गावांना प्रत्येक पावसाळ्यात धोका निर्माण होत असल्यामुळे या गावातील ग्रामस्थांनी संबंधित शासकीय कार्यालयात पुनर्वसनाची वारंवार मागणी करूनही त्यांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी न झाल्यामुळे पसरलेला असंतोष, मंठा तालुक्यातील तळणी, मंठा शहर, देवठाणा अवलकाव, शिरपूर, बेलोरा, वझर सरकटे, तळतोडी, माळतोंडी, हेलह, लिंबे-वडगाव, ढेंगे-वडगाव, गडदेपांगरा इत्यादी गावांमध्ये पावसामुळे आवाक्याबाहेर गेलेली स्थिती, शासनाकडून अद्यापही कोणतीही मदत अथवा सानुग्रह अनुदान न पोहचल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली तीव्र नाराजी, नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी अथवा तिचा मुकाबला करण्यासाठी विदर्भातील तसेच मराठवाडयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक सहाय्य देणे तसे ओला दुष्काळ जाहीर करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अकरा : समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव :-

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,-

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. नाना पटोले व श्री.जितेंद्र आव्हाड यांनी "लेक लाडकी"अभियानाच्या प्रवर्तक ॲड.वर्षा देशपांडे यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.भारत भालके यांनी श्री. राजेश प्रधान,जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

(३) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.शशिकांत शिंदे व इतर सन्माननीय सदस्यांनी वृत्त

निवेदक, कार्यक्रम सूत्र संचालक व संपादक आयबीएन लोकमत वृत्त वाहिनी यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

या तीन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.स. नियम १८३ (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

बारा : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).

तेरा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

चौदा : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर)

पंधरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-

सर्वश्री एकनाथराव खडसे(पाटील),सुभाष देसाई,बाळा नांदगांवकर,गणपतराव देशमुख, देवेंद्र फडणवीस, गिरीष बापट, सुधीर मुनगंटीवार, रविंद्र वायकर, नाना पटोले,श्रीमती मिनाक्षी पाटील,सर्वश्री गिरिष महाजन,नितीन सरदेसाई, ॲड.आशिष जयस्वाल,सर्वश्री चैनसुख संचेती,विजयराज शिंदे, प्रकाश शेंडगे,विजय शिवतारे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असून माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागवून सत्य माहिती जनतेसमोर उघड करणाऱ्या (RTI) कार्यकर्त्यांच्या दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या व अल्पवयीन मुली व महिलांवर सामुहिक बलात्कार करुन त्यांच्या हत्या करण्याच्या तसेच ॲसिड व उकळते तेल टाकून जिवे मारण्याच्या आणि खंडणीसाठी अल्पवयीन मुले, व्यापारी व बिल्डर्स यांच्या होणाऱ्या हत्या रोखण्यात शासनास आलेले अपयश, चोऱ्या, दरोडे, बँका व ज्वेलर्सची होणारी लूट, सायबर गुन्हे, महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या खेचण्याच्या घटना वाढीस लागून लोकल ट्रेनमध्ये महिलांवर हल्ले होऊन त्यांचा होत असलेला विनयभंग व लैंगिक अत्याचार, पाकिस्तानी, बांगलादेशीय व इतर परकीय व्यक्तींकडून अंमली पदार्थ व बनावट नोटा चलनात सहजगत्या उपलब्ध होणे, दुप्पट रकमेचे आमिष दाखवून खासगी व्यक्ती व संस्थांकडून सर्वसामान्य गरजू जनतेची होत असलेली फसवणूक, वाढत्या नक्षलवादी कारवाया रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात न आल्यामुळे त्यांचे हल्ले सुरुच असणे, वाळू माफियांकडून सरकारी अधिकारी, पोलीस व सर्वसामान्य जनता यांच्यावर होणारे प्राणघातक हल्ले व त्यांच्या करण्यात येत असलेल्या हत्या, तुरुंगातील कुविख्यात कैद्यांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा होत असून त्यांना मिळणारी शाही वागणूक व त्यातुनच तुरुंगातील कैद्यांवर होणारे प्राणघातक हल्ले, यामुळे व तुरुंगात क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवल्यामुळे कैद्यांच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेला प्रश्न, तसेच राजकीय हस्तक्षेपामुळे आरोपींवर कारवाई करण्यात होत असलेला विलंब, पोलिसांकडून

गुन्हेगारांचा शोध घेऊन कारवाई करण्यात होत असलेला विलंब व पिडीत महिलांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीसाठी शासनाकडे निधी उपलब्ध नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनावर व पोलिसांवर ओढलेले ताशेरे, तसेच पोलिसांमधील वाद व त्यांच्या विविध समस्या सोडविण्यास शासनाला आलेले अपयश, मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अद्यापपर्यंतही सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नसून राज्य सुरक्षा परिषदेच्या बैठका वेळेवर न होणे, विविध विभागात भ्रष्टाचार व लाचखोरीची प्रकरणे उघडकीस येत असतानाही शासनाकडून त्याबाबत कारवाई करण्यात होत असलेला अक्षम्य विलंब व टाळाटाळ आणि आदर्श सोसायटी प्रकरणी नेमलेल्या समितीचा अहवाल त्यामध्ये झालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार दडपण्यासाठी अद्यापही सभागृहात सादर करण्यात न येणे, तसेच गॅस, पेट्रोल व इंधनाच्या झालेल्या दरवाढीचा परिणाम सर्वच क्षेत्रावर होऊन वाढलेल्या महागाईत राज्यातील जनतेला दैनंदिन गरजेच्या जीवनावश्यक वस्तू व भाज्या नियंत्रित दरात पुरविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात तसेच दलाल, साठेबाज यांच्यावर कारवाई करण्यात शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून राज्यातील जनतेच्या सुरक्षेच्या आणि जीवन जगण्याच्या निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवर योग्य त्या उपाययोजना करण्यासंदर्भातील शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे जनमानसात निर्माण झालेली तीव्र चीड व त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सोळा : म.वि.स. नियम २९२ च्या प्रस्तावाच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-

उद्योग मंत्री : **"राज्यातील विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेशातील वाढता अनुशेष"** या विषयावरील दिनांक १० जून, २००४ रोजी झालेल्या म.वि.स. नियम २९२ च्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनाबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

सतरा : शासकीय विधेयके :-

(१) पुर:स्थापनार्थ :-

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ विधेयक, २०१३.

---

(२) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३ यात विधानपरिषदेने केलेल्या सुधारणांना सहमती देणे.

अठरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(दिनांक २६ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. १ ते ७)

(१) **श्री.देवेंद्र फडणवीस , वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर येथील गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाबाबत वर्षानुवर्षे होऊनही कोणतीही प्रगती झाली नसणे, त्रुटी दूर करुन सन २००९ मध्ये ७२० कोटी रुपयांचा आराखडा परत सादर करण्यात आला असणे, पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प राबविण्याचे निश्चित होत असणे, राज्य व केंद्राचा निधी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाची परवानगी व रेस्क्यु सेंटरला सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीची प्रतिक्षा असणे, विदर्भाचा भौगोलिक व वनसंपदेचा विस्तार लक्षात घेता व्यावहारिक दृष्टया यशस्वी होणाऱ्या प्रकल्पाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष."

(२) **श्री. विजय घोडमारे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ट्रान्सप्लांट युनिट ३ वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, किडणी स्टोनच्या उपचारासाठी असलेले लिथोट्रिप्सी मशिन तंत्रज्ञांअभावी बंद असणे, मेयो आधुनिकीकरणाची प्रक्रिया मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या वर्षी मेयोचा अपेक्षित विकास न झाल्याने एम.बी.बी.एस.च्या ४० जागा कायम रद्द होण्याचा संभाव्य धोका टाळण्यासाठी विकास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मेयो प्रशासनाने वैद्यकीय संचालनालयाकडे पत्र देणे, मेडीकल प्रशासन कॅन्सरग्रस्तांच्या बाबतीत उदासीन असल्याने प्रतिक्षा यादी मोठ्या प्रमाणात वाढणे, रेडिओथेरपी तंत्रज्ञांची कमतरता असणे, राज्यात नागपूर येथे एम.डी. रेडिओथेरपी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, या अभ्यासक्रमाकरिता यंत्र सामुग्रीची पूर्तता केलेली नसणे, संस्थेतील कोबाल्ट यंत्रही जुने झाल्याने क्षमता ५०% पेक्षा कमी झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(३) **श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"भटक्या व विमुक्त (धनगर) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गठीत रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात विलंब होणे, राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे दीड कोटी असून ९०% लोकांकडे हक्काची जमीन नसणे, धनगर समाजाला विकासाअभावी शासकीय योजनांचा फायदा मिळू न शकणे, तसेच कायदेशीर व्यवसाय नसल्याने समाज गुन्हेगारीच्या चक्रात फसणे, धनगर समाज सर्वात गरीब, निरक्षर आणि वंचित घटक असून ९८% लोक बेघर व भूमिहीन असणे, त्यामुळे धनगर समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

(४) **श्री. सुधीर पारवे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर सुधार प्रन्यासाने आरक्षित केलेले भूखंड आरक्षणातून वगळण्याचा अधिकार नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींना असूनसुध्दा आरक्षित भूखंड मोकळे केलेले नसणे, नागपूर येथील नो शॉपिंग स्ट्रीटसारख्या अव्यवहार्य योजनांमुळे विकासात निर्माण झालेला अडसर, २२ ले आऊटचा प्रस्ताव प्रलंबित असणे, नागपूर शहरातील ५७२ व १९०० ले आऊट मधील विकास कामे अपूर्ण असणे, अनेक ले आऊटची विकास कामेच सुरु झालेली नसणे, नागरी सुविधांअभावी रहिवाशांची गैरसोय होत असणे, नागपूर सुधार प्रन्यासाने वर्षभरात गुंठेवारी अंतर्गत एकही अभिन्यास मंजूर न करणे, वर्धा रोडवरील गैरकृषी वापराची परवानगी गावठाणापासून ७५० मीटरवर देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. रविंद्र वायकर, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"सूरजकुंड (हरियाणा) मेळाव्याच्या धर्तीवर राज्यातदेखील सूरजकुंडसारखा सर्व सुखसोयीनी युक्त असा शिल्पग्राम प्रकल्प राबविण्याबाबत मौ.मजासगाव, ता.अंधेरी येथील न.भू.क्र.१९०/ब मधील मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेला भूखंड महामंडळाकडे वर्ग करण्याबाबत दिनांक ३१ जुलै, २००७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना विनंती करणे, उक्त जमिनीचे मनोरंजनाचे मैदान (आर जी) म्हणून असलेले आरक्षण बदलून ते शिल्पग्राम करणेबाबतचा प्रस्ताव महामंडळातर्फे दिनांक २४ ऑगस्ट, २००७ रोजीचे पत्रान्वये नगरविकास विभागास सादर करण्यात येणे, या योजनेसाठी १२ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार निधी प्राप्त झाल्याचे २९ ऑगस्ट, २००७ रोजीच्या पत्रान्वये कळवूनही अद्याप जागेच्या आरक्षणाबाबत कोणताच निर्णय झालेला नसणे, सदर जमीन अद्याप महामंडळाच्या ताब्यात मिळालेली नसल्यामुळे पुढील कार्यवाहीस विलंब होणे, उपरोक्त प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होवून तीन-चार वर्षाचा कालावधी उलटूनही केवळ जागेअभावी शिल्पग्रामचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सदर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू होण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. सुधीर पारवे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील ओ.बी.सी आणि व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांना पोस्टमॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे सुमारे ११०० कोटी रुपये शासनाने वितरित न करुन विद्यार्थ्यांवर अन्याय केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, केंद्र शासनाद्वारे राज्य शासनाच्या माध्यमातून दिली जाणारी ही शिष्यवृत्ती मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, ओ.बी.सी. आणि व्ही.जे.एन.टी. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वितरित करण्यात सरकार जाणूनबुजून विलंब करीत असून हळूहळू ही योजना बंद करण्याचा शासनाचा कट उघड होणे, केंद्र शासनाने ११ ऑगस्ट, २०११ रोजी राज्याला कळविलेल्या निर्णयानुसार शिष्यवृत्तीचे नवे दर तसेच बी.बी.ए., बी.सी.ए. तथा बी.सी.सी.ए. तसेच इतर नवे अभ्यासक्रम त्याच्यामध्ये समाविष्ट करण्यात आले असले तरी राज्य शासनाने या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, ओ.बी.सी. नॉन क्रिमीलेयरची उत्पन्न मर्यादा ७ लाख रुपये करण्याबाबत तसेच ई.बी.सी. सवलतीकरिता उत्पन्न मर्यादा ४.५० लाख इतकी करण्याकरिता वारंवार मागणी होत असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री. प्रकाश शेंडगे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"धनगर आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती यांना एसटीच्या सवलती लागू कराव्यात यासाठी विविध आयोग स्थापन करण्यात येणे, या आयोगाने आपले अहवाल देणे, कालेलकर आयोग, बापट आयोग, अग्रवाल आयोग आदी आयोग असणे, अग्रवाल आयोगाची मुदत दि. ३० मार्च, २०११ रोजी संपणे, या आयोगाने गेल्या ६ वर्षामध्ये कोणत्याही बैठका न घेणे, केंद्र शासनाने घोषित केलेल्या अनुसूचित जमातींच्या महाराष्ट्र राज्याच्या यादीत धनगर समाजाचा समावेश असणे, तथापि समावेश करताना धनगर या शब्दातील 'र' या अक्षराऐवजी 'ड' या अक्षराचा चुकीने वापर करणे, त्यामुळे राज्यातील धनगर समाज अनुसूचित जातीच्या सवलतींपासून वंचित राहणे, या समाजाला एसटीच्या सवलती त्वरित लागू कराव्यात यासाठी अनेक संघटनांनी वारंवार राज्याच्या प्रत्येक जिल्हयामध्ये, मुंबईमध्ये मोठेमोठे मोर्चे काढून सरकारकडे निवेदन दिलेले असणे, राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे यासंबंधीचे सर्व पुरावे सादर केलेले असणे, यामुळे राज्यातील धनगर आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती या संवर्गामध्ये राज्य शासनाविरोधी तीव्र असंतोष पसरलेला असणे, परंतु याबाबतीत आजतागायत निर्णय न लागणे, याकडे राज्य शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने करावयाची तातडीने कार्यवाही व उपाययोजना."

(दिनांक २९ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. ८ ते १४)

(८) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि शिक्षणाचे सार्वत्रीकरण व्हावे या मूळ उद्देशातून राबविण्यात येत असलेले सर्व शिक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी करार कर्मचारी विषयतज्ञ (साधनव्यक्ती) यांनी अहोरात्र परिश्रम घेणे, राज्यभरात या योजनेअंतर्गत कंत्राटी पध्दतीने सुमारे २० हजार कर्मचारी कार्यरत असणे, राज्यात कंत्राटी पध्दतीने ६-६ महिने कालावधीत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदर कर्मचारी गत १२ वर्षापासून कार्यरत असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी प्रलंबित असणे,राज्यातील सर्व करार कर्मचारी हे उच्च शैक्षणिक अर्हताधारक असून कामाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना असणे, सदर करार कर्मचाऱ्यांची नियुक्ती गुणवत्ता तसेच बिंदुनामावली नुसार शासकीय भरती प्रक्रियेच्या विहित नियमावलीप्रमाणे जिल्हा निवड समितीमार्फत विविध पदांवर करण्यात येणे, राज्यातील बऱ्याच सुशिक्षितांनी या प्रकल्पात काम करताना शासकीय सेवेसाठीची विहित वयोमर्यादा ओलांडणे, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार सर्व शिक्षा अभियानातील उत्तम कार्याबद्दल महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असल्याचे जाहीर असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याच्या मागणीकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष."

(९) **श्री.संजय भेगडे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त्या करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, कृषी

पदवी, पदविका उत्तीर्ण तसेच उच्चशिक्षित असलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागणे, नियोजन विभागाच्या दिनांक २ मे २०११ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामरोजगार सेवकांचे काम अर्धवेळ स्वरूपाचे असेल असे नमूद असतानाही त्यांना रात्रंदिवस काम करावे लागणे, वाढत्या महागाईच्या काळात त्यांना केवळ सव्वादोन टक्के कमिशनवर कुटुंबाची गुजराण करावी लागणे व त्यांना आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, त्यांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार शासनसेवेत सामावून घेण्यात यावे या व अन्य मागण्या शासनदरबारी प्रलंबित असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(१०) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची नितांत आवश्यकता, कृषी विद्यापीठाच्या स्थापनेच्या दृष्टीने मुल तालुक्यात सर्व अनुकूल बाबी उपलब्ध असणे, अमरावती आणि नागपूर विभागातील पीक पद्धती वेगवेगळी असणे, त्यामुळे निर्माण झालेला असमतोल लक्षात घेता नागपूर विभागात पूर्व विदर्भासाठी कृषी विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे असणे, पूर्व विदर्भातील धान उत्पादक प्रदेशामध्ये हे कृषी विद्यापीठ स्थापन झाल्यास शेतकऱ्यांच्या जीवनात नवे परिवर्तन घडणार असल्याने अकोला येथील पंजाबराव कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भात मुल येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(११) **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिकरणामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदुषणात देशात चौथ्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आलेला असणे, प्रदुषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या नियमांचे उद्योजकांकडून उल्लंघन होत असल्यामुळे प्रदुषणात दिवसेंदिवस भर पडत असणे, सांडपाणी व्यवस्थापन होत नसल्यामुळे दूषित पाणी रस्त्यावर येवून लगतच्या शेतात व नाल्यात जात असणे, जड वाहनांकरिता ठरवून दिलेल्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात प्रदुषणात भर पडत असून रस्ते खराब होत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदुषणाला आळा घालणे अत्यंत गरजेचे असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(१२) **श्री.विकास कुंभारे , वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील मानकापूर उड्डाणपूल बांधण्यासाठी रहदारीसाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था अद्यापही निर्माण झालेली नसणे, मनिष नगर रेल्वे उड्डाणपुलासाठी स्थापित समितीने विविध पर्यायांसह आपला अहवाल शासनास सादर केला असणे, रेल्वे उड्डाणपूल बांधकामास येणारा खर्च सुसाध्यता व अडचणी लक्षात घेता ५ पर्याय अभ्यासाअंती शासनास सादर करताना Twin Cell RCC Box जोड रस्ता बांधण्याचा पर्याय सोईचा असल्याचे

अहवालात नमूद करण्यात आले असणे, हिंगणा रोडवर अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे, या रस्त्यावर एम.आय.डी.सी. विविध शाळा, कॉलेज, मेडिकल कॉलेज, सी.आर.पी.एफ, एस.आर.पी.एफ व शहराच्या वाढत्या विस्तारामुळे लगतच्या गावाचे वाढते नागरीकरण यामुळे वाहतुकीची कोंडी होवून मोठ्या प्रमाणात अपघात घडत असणे, यामुळे हिंगणा रोड टी-पॉईंट ते सी.आर.पी.एफ गेटपर्यंत उड्डाणपुलाची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१३) **श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"विदर्भात राष्ट्रसंताचे समाधी स्थळ असलेल्या गुरुकुंज आश्रमाला रस्त्याच्या चौपदरीकरण व उड्डाणपुलामुळे धोका निर्माण होणे, नागपूर-मुंबई महामार्ग अमरावती जवळील तुकडोजी महाराजांच्या गुरुकुंज आश्रमाला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१४) **श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"सफाई कामगारांच्या आर्थिक विकासासाठी महर्षी सुदर्शन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, अनुसूचित जमातीतील भंगी, मेहतर, डोम, डुमार इत्यादी जातींना त्यांचे आराध्य दैवत असलेल्या सुदर्शन समाज या सुधारित नावाने मंजुरी देण्याची आवश्यकता, नियमित आर्थिक विकास महामंडळाला महर्षी सुदर्शन व महर्षी वाल्मिकी यांचे नाव देणे, राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व अन्य संस्थांमध्ये ऐवजदार, बदली कामगार, रोजंदार, ठेकापध्दती व हजेरी स्वरुपात सफाई कामगारांच्या कल्याणासाठी माथाडी बोर्डासारखे एक स्वतंत्र बोर्ड स्थापित करुन सफाई ही अनिवार्य सेवा असल्याने सफाई कामगार पद निर्माण करण्याकरिता असलेली आस्थापना खर्चाची अट शिथिल करुन आकृतीबंदाची शासकीय मर्यादा रद्द करणे, सफाई सेवेत ठेवा पध्दती पूर्णपणे बंद करुन शासनाच्या लाड समिती व पागे समितीच्या अहवालातील शिफारशींवर त्वरित कार्यवाही करुन शासनाच्या सर्व विभागांमध्ये लागू करण्याची आवश्यकता, असंघटीत कामगार सामाजिक सुधारणा कायदा, २००८ च्या कलम ५ अंतर्गत राज्य सरकाद्वारे बोर्ड त्वरित गठीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. १५ व १६)

(१५) **श्री. कुमार आयलानी, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्हयातील बल्लारशाह प्लायवूड कारखान्यातील व्यवस्थापनाने कामगारांना विश्वासात न घेता कारखाना तोटयात असल्याचे कारण सांगून माहे नोव्हेंबर २००८ पासून अचानक बंद करणे, आजतागायत कारखाना बंदच असणे, दरम्यान कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात अनेक बैठका होणे, माहे एप्रिल, २००९ मध्ये कामगार व व्यवस्थापनात

झालेल्या करारात जोपर्यंत कारखाना बंद राहील त्या कालावधीत कामगारांना ५० टक्के वेतन देण्याचे उभयपक्षात ठरणे, तसेच कारखाना बंद राहील त्या कालावधीत निवृत्त झालेल्या कामगारांना त्यांच्या हक्काची ग्रॅच्युईटी, बोनस व इतर देणी देण्याचे ठरले असतानासुध्दा व्यवस्थापनाने कराराचे पालन न करणे, त्यामुळे कामगार तसेच सेवानिवृत्त कामगार यांच्यावर उपासमारीची पाळी येणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१६) **श्री.संजय भेगडे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर तालुक्यासाठी क्रीडा संकुल अर्थात स्टेडियम मंजूर करण्यात आले असून त्यासाठी निधीसुध्दा मंजूर करण्यात येणे, बल्लारपूर शहरात सार्वजनिक मैदान, क्रिडांगण उपलब्ध नसल्यामुळे क्रीडा संस्थांची, शाळा तसेच महाविद्यालयांची प्रचंड गैरसोय होणे, या तालुक्यात क्रीडा विषयक उपक्रमांसाठी, स्पर्धांसाठी स्टेडियम जलदगतीने जनतेच्या सेवेत रुजू होण्याची आवश्यकता असणे, हा भाग आदिवासी बहुल, नक्षलप्रभावित भाग असणे, या क्रीडा संकुलासाठी मंजूर १ कोटी रु. निधी क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी अल्प असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा करुनही शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. १७ ते २२)

(१७) **श्री.उमाजी बोरसे, वि.स.स.**

"राज्यात जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक स्वराज्य संस्था कर लागू करण्याबाबत" या विषयावरील **श्री.विलास लांडे व इतर वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ९८०६७ ला दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(१८) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत" या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ७९३८१ ला दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(१९) **श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.**

"राज्यातील महामार्गावरील टोल वसुलीतून जनतेची लूट होत असल्याबाबत" या विषयावरील **श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.** यांच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५१२ मधील प्रश्न क्रमांक ८४९८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२०) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

"नागपूर पोलीस आयुक्तालयात परिवहन विभागात झालेला ४० लाखांचा गैरव्यवहार" या विषयावरील **श्री. आर. एम. वाणी, वि.स.स.** यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५४७ मधील प्रश्न क्रमांक ९२०२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२१) श्री.भिमराव तापकीर,वि.स.स.

"चंद्रपूर-वरोरा या ४० कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत" या विषयावरील **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १११५७२ ला दिनांक २४ जुलै, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : ३१ जुलै, २०१३.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.